# माझी पुस्तिका
# भाषा १ (मराठी)



## समग्र शिक्षण

ज्ञानसेवा तु साफल्यम्

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण)

७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे – ४११०३०.

**इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी स्तराधारित अध्ययन कार्यक्रम २०१८-१९**
**'माझी पुस्तिका भाषा १ (मराठी)'**

**प्रवर्तक :**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.

**विशेष प्रेरणा :**
मा. विनोद तावडे, मंत्री,
शालेय शिक्षण व क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,
अल्पसंख्याक विकास व वक्फ, महाराष्ट्र राज्य.

**प्रेरणा :**
मा. वंदना कृष्णा, (भा.प्र.से.) अपर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

**मार्गदर्शन :**
मा. डॉ. विशाल सोळंकी, (भा.प्र.से.) आयुक्त शिक्षण,
महाराष्ट्र राज्य तथा, राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा, मुंबई.

**प्रकाशन :**
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे-३०.

**संपादक :**
डॉ. सुनिल मगर, संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे तथा
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे.

**कार्यकारी संपादक :**
डॉ. शोभा खंदारे, उपसंचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे.

**समन्वयक :**
डॉ. जगराम भटकर, विभाग प्रमुख, मराठी, महा. रा. शै. सं. व प्र. प. (विद्या प्राधिकरण), पुणे.
सुजाता लोहकरे, उपविभाग प्रमुख, मराठी, महा. रा. शै. सं. व प्र. प. (विद्या प्राधिकरण), पुणे.
सचिन लोखंडे, अधिव्याख्याता, मराठी, महा. रा. शै. सं. व प्र. प. (विद्या प्राधिकरण), पुणे.
पुष्पलता कांबळे, विषय सहाय्यक, मराठी, महा. रा. शै. सं. व प्र. प. (विद्या प्राधिकरण), पुणे.

**संकल्पना व लेखन :**
मीना निमकर, निलेश निमकर, क्वालिटी एज्युकेशन सपोर्ट ट्रस्ट (क्वेस्ट)

**विशेष सहकार्य :**
युनिसेफ, महाराष्ट्र

**प्रथम आवृत्ती :** सप्टेंबर २०१८

**प्रती - १,३५,०००**

**मुद्रक :**
रुना ग्राफिक्स, सिंहगड रोड, पुणे.

# माझी पुस्तिका
# भाषा १ (मराठी)



विद्यार्थ्याचे/विद्यार्थिनीचे नाव : ____________________

## समग्र शिक्षण

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण)**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३०.

## 'मनोगत'

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

स्तराधारित अध्ययन कार्यक्रमात तुमचे स्वागत! या कार्यक्रमातील 'माझी पुस्तिका भाषा १ (मराठी)' हे तुमच्यासाठी तयार केलेले पुस्तक तुमच्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे.

मराठी ही आपली राज्यभाषा आहे. आपण तिचा वापर संभाषणात, वाचण्या-लिहिण्यात करतो. तुम्हाला मराठी भाषा सहजतेने बोलता येते व समजतेही. परंतु समजपूर्वक वाचण्यासाठी व लेखनासाठी तुम्हाला मदतीची गरज आहे, हे चाचणीद्वारा समजले. ही पुस्तिका व हा कार्यक्रम तुमच्या वाचन-लेखन क्षमता विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

'माझी पुस्तिका भाषा १ (मराठी)' हे पाच घटकांत विभागले असून त्या प्रत्येक घटकामध्ये विविध अक्षरांचे व स्वरचिन्हांचे गट करून त्याचा परिचय करून दिला आहे. याच बरोबर परिचित झालेल्या अक्षरांवरून व स्वरचिन्हांतून चित्रांची नावे लिहिणे, मजकूर वाचून प्रश्नांची उत्तरे लिहिणे, शब्दकोडी सोडविणे, अर्थपूर्ण वाक्य बनविणे यांसारख्या आनंददायी कृतींचा समावेश केला आहे, याचा आनंद तुम्ही घ्या.

मित्रांनो, ही पुस्तिका व या बरोबर शिक्षकांनी दिलेले अध्ययन अनुभव यांच्या सहाय्याने कमी कालावधीत, मुले आनंदाने वाचन लेखन शिकू शकतात असा वेगवेगळया ठिकाणचा अनुभव आहे. तुम्ही पण लवकरच वाचन लेखनातील आवश्यक क्षमता 'माझी पुस्तिका भाषा १ (मराठी)' च्या मदतीने प्राप्त कराव्यात आणि याचा उपयोग करून इतर विषयातही आत्मविश्वासाने प्रगती साधावी, यासाठी तुम्हांला शुभेच्छा !

डॉ. सुनिल मगर
संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे



# घटक १

म क त न घ ा झ

ह प य े च

या घटकातील अक्षरे पाहून लिही.

म ______ ______ ______ ______ ______ ______

क ______ ______ ______ ______ ______ ______

त ______ ______ ______ ______ ______ ______

न ______ ______ ______ ______ ______ ______

घ ______ ______ ______ ______ ______ ______

झ ______ ______ ______ ______ ______ ______

ह ______ ______ ______ ______ ______ ______

प ______ ______ ______ ______ ______ ______

य ______ ______ ______ ______ ______ ______

च ______ ______ ______ ______ ______ ______

म ा
म ा
मा
मामा

खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ा लाव आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| | |
|---|---|
| क म | काम |

| | |
|---|---|
| माझ | क च |
| क का | म प |
| म मा | नम |
| त क | घ म |
| ह क | झ क |
| नयन | तनय |
| क त | न क |

े
े
क क के केक

खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी े लाव आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| | |
|---|---|
| झप | झेप |

| | |
|---|---|
| कतन | पय |
| चमच | काम |
| माझ | मघना |
| चतन | हमा |
| नता | चन |
| नम | झप |
| मनका | काचचा |

चित्रांची नावे लिही व वाच.







कप







चौकटीतून शब्द शोधून लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| घा | म | ना | ना |
| प | ता | का | च |
| मा | मा | का | म |
| मा | झे | म | चे |

ऐक आणि लिही.

हे वाच

## नेहाचा नाच

नेहा, हा माझा काका. केतन काका.
आणि हा नयन मामा.
मामा आणि काका या.
नेहा नाचत आहे.
तिचा नाच पाहा.






खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) काकाचे नाव काय आहे?

२) नयन मामाच्या भाचीचे नाव उताऱ्यात आले आहे का? असल्यास कोणते?

३) काका आणि मामा काय पाहणार आहेत ते पुढील जागेत लिही.

हे वाच

## चहा करू !




मेघना आणि हेमा या. चेतन ये.
चहा करू या.

चेतन चहा झाला. कप घे.
चहा गाळ. कपात ओत.
चमचे आणि केक घे.

मेघना चहा घे. हेमा चहा घे.
चेतन चहा घे. केक पण घे.



खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) चहा कपात कोणी ओतला असेल? ______________________

२) हा उतारा कशाविषयी आहे? ______________________

३) सगळ्यांनी चहा बरोबर काय खाल्ले असेल? ______________________

हे शब्द वापरून अर्थपूर्ण वाक्ये बनव आणि लिही.

लक्षात ठेवायचे शब्द

आणि मग पण

केतन तनय मामा काका हेमा नयना चेतन

कान पेन केक ताक पताका पाने चमचा पाय

ने घे चेप काप झाक

चित्रात बाणाने दाखवलेल्या अवयवांची नावे लिही व वाच.





# घटक २

ब र ल ी द ण

ई आ ि व

या घटकातील अक्षरे पाहून लिही.

ब ______ ______ ______ ______ ______ ______

र ______ ______ ______ ______ ______ ______

ल ______ ______ ______ ______ ______ ______

द ______ ______ ______ ______ ______ ______

ण ______ ______ ______ ______ ______ ______

ई ______ ______ ______ ______ ______ ______

आ ______ ______ ______ ______ ______ ______

व ______ ______ ______ ______ ______ ______

खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ी लाव आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

त ी
त ी
ती
तीन

माम मामी

| | |
|---|---|
| प क | चकल |
| कब र | बातम |
| वह | चाव |
| नद | बदाम |
| झाकण | कारल |

खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ि लाव आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

ि द
ि द
दि
दिवे

हरवा हिरवा

| | |
|---|---|
| तरका | चमणा |
| कराणामाल | वमान |
| क वता | म हना |
| र ववार | चव चव |
| कनारा | बयाणे |

खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ी व ी लाव आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| | | |
|---|---|---|
| चमण | मरच | पपाण |
| पचकार | बातम | कत |

चित्रांची नावे लिही व वाच.




ऐक आणि लिही.

__________ __________ __________ __________

__________ __________ __________ __________

गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द लिही.

(कारली, दारात, वेल, काही, घरी, ताईला, लहान)

__________ बी लावलं. पाणी घातलं. लहान __________ पाने आली. __________ वरवर गेली. वेलीला हिरवी हिरवी __________ लागली. आईने __________ कारली घरी आणली. __________ दिली. माईला दिली. तरीही __________ राहिली.

चौकटीतून शब्द शोधून लिही.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| च | क | ली | द | पा |
| पि | च | का | री | ते |
| पा | रा | पा | णी | ली |
| मि | र | ची | पा | म |
| ल | व | क | र | णी |

ऐक आणि लिही.

चित्रांची नावे लिही व वाच.







हे वाच

## माईने चादर का घेतली नाही?

लक्षात ठेवायचे शब्द

**कशी**
**घासाघीस**
**गावाला**
**गेली**

दारात चादरवाला आला.
काका दारात आला. काकी दारात आली.
आई दारात आली.
माई दारात आलीच नाही.

काकाने चादर पाहिली. काकीने चादर पाहिली.
आईने चादर पाहिली.
माईने चादर पाहिलीच नाही.

काकाने घासाघीस केली. काकीने घासाघीस केली.
आईने घासाघीस केली.
माईने घासाघीस केलीच नाही.

काकाने चादर घेतली. काकीने चादर घेतली.
आईने चादर घेतली.
माईने चादर घेतलीच नाही.

का बरे? माईने चादर का नाही घेतली?
ती दारातच आली नाही तर चादर कशी घेईल?
पण माई दारात का नाही आली?
अगं ती कालच गावाला गेली नाही का!



हे वाच

# झाकण हरवले !




आईने मीनाला हाक दिली.
मीना, ये. ही बरणी घे आणि नानीला नेऊन दे.
का?
अगं, ती मला दही देणार आहे.
दही? कशासाठी?
अगं, मला ताक करायचे आहे.
ताक? कशासाठी?
मामा मामी येणार आहेत ना!
बरे, दे बरणी.
ही घे. झाकण दे की.
झाकण? झाकण हरवले.



खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) ताक बनवायला दही कोण देणार आहे?

२) आईला ताक का करायचे आहे?

३) मीनाच्या घरी आज दही असेल का?

हे वाच




## बेत !

आज रविवार आहे.
दादा आणि वहिनी आले आहेत.
त्यांनी केक आणला आहे.

आईने घरी चकली केली आहे.
आपण पोहे करू या आणि
थोडा चहा करू या.

वा मस्त बेत आहे.
पण, बाबांना चकली चावणार नाही.
ते पोहे खातील आणि चहा घेतील.





खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) केक कोणी आणला आहे?

________________________________________

२) खायला काय काय केले आहे?

________________________________________

३) बाबांचे दात मजबूत आहेत का? योग्य उत्तराला गोल कर.

(अ) हो (आ) नाही.

तुला हे ज्या वाक्यावरून कळलं त्या वाक्याखाली रेघ मार.

चित्रातील माणसे काय काय करत आहेत ते बघ आणि लिही.



आई चहा पीत पीत पेपर

वाचते आहे.





हे वाच

दादा: “ केतन, हे बघ.”
केतन: “ काय? पिपाणी! मला दे ना.”
दादा: “ नाही देणार. माझी आहे.”
केतन: “ दे ना रे दादा.”
दादा: “ ही नाही.”
केतन: “ नवी दे.”
दादा: “ देईन. मला काय देणार?”
केतन: “ बेदाणे.”
दादा: “ पिपाणी घे. बेदाणे दे.”

योग्य उत्तराला गोल कर.

१) बेदाणे कोण देणार आहे?

(अ) केतन (आ) दादा
(इ) आई

२) संवादात किती माणसे बोलत आहेत?

(अ) दोन (आ) एक
(इ) तीन



# घटक 3

ड ळ श ट ृ ध
ग ा फ ज

या घटकातील अक्षरे पाहून लिही.

ड

ळ

श

ट

ध

ग

फ

ज

क ो
क ो
को

कोळी

खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ा लाव आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| | |
|---|---|
| ड ळा | डोळा |

| | |
|---|---|
| म र | नाकत डा |
| क बी | झ पाळा |
| किल | प ती |
| ट पली | म गरा |
| शेकटी | फोट |
| ध तर | ज डी |
| ह डी | फ डी |

च
च
ू ू
चू

चूल

खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ू आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| | |
|---|---|
| मल | मूल |

| | |
|---|---|
| तर | दर |
| कापर | वार ळ |
| शेप | नाजक |
| लाड | गह |
| हळहळू | किटाण |
| नागपर | जादगार |
| वाळ | बेडक |

चौकटीतून शब्द शोधून लिही.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दो | रा | गो | ड | चू |
| ड | जा | दा | पू | ल |
| का | क | व | त | गो |
| पे | ला | री | ना | री |
| दू | ध | ह | तू | र |

चित्रांची नावे लिही व वाच.








ऐक आणि लिही.

हे वाच

लक्षात ठेवायचे शब्द

मस्त

पुस्तक

खायचे

## रविवार

आज रविवार आहे. मस्त आराम करायचा. नदीवर जायचे आणि पोहायचे. घरी परत यायचे आणि गरम गरम बटाटेवडे खायचे. पुस्तक वाचत पडून राहायचे. आईने हाक मारली की मगच जेवायला जायचे. जेवण करून मस्त झोपायचे.



१) वरील उताऱ्यातील म्हणणे पुढीलपैकी कोणाचे असेल? योग्य उत्तराला गोल कर.

(अ) आजी (आ) पाहुणी आलेली काकी (इ) शाळकरी मुलगी

हे तू कशावरून ठरवलसं ते सांग.

ऐक आणि लिही.



# दगडू आणि गोदूचे शेत

गोदू आणि दगडूचे शेत आहे. ते शेतात भात लावतात. कालच दोघांनी आवणी केली. आता दोन-तीन महिने फारसे काम नाही. दगडू आता वारीला जाईल. वारीत वारकरी अभंग गातील. दगडूही टाळ वाजवून अभंग गाईल. वारी चालत चालत पंढरपूरला पोचेल. परत येताना दगडू गाडीने घरी येईल.

लक्षात ठेवायचे शब्द

भात आवणी अभंग पंढरपूर फारसे

खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) दगडूला दोन-तीन महिने शेताचे फारसे काम का नसेल?

___

२) दगडूला पंढरपूरला जायला आणि यायला सारखाच वेळ लागेल का? कशावरून?

___

३) वारकरी म्हणजे कोण? ___



चित्रातील माणसे काय काय करत आहेत ते बघ आणि लिही.







हे वाच

## रानशेतचे धरण

हे आमचे रानशेत गाव. गावातून नदी वाहते. नदीवर धरण आहे. धरणाचे पाणी शेताला वापरतात. धरण बघायला बरेच लोक येतात. धरणाची माहिती घेतात. धरणाजवळ बाग आहे. धरण बघायला आलेली लोकं बागेत पण जातात. एक फेरफटका मारतात. मजा करतात आणि परत जातात.

धरण कशासाठी बांधलं आहे? योग्य उत्तराला गोल कर.

(अ) माहिती देण्यासाठी

(आ) शेतीला पाणी वापरता यावे म्हणून

(इ) बागेत फेरफटका मारण्यासाठी

हे वाच

## बबू, गबू आणि डबू

बबू, गबू आणि डबू बोरे आणायला गेले.
बबूने बोरे पाडली. गबूने बोरे पाडली.
डबूला बोरे पाडताच येईनात.

डबूने बबूकडे बोरे मागितली.
पण बबूने बोरे दिलीच नाहीत.

मग डबूने गबूकडे बोरे मागितली.
गबूनेही बोरे दिली नाहीत.
डबू रडू लागला.

मग बबूने डबूला बोरे दिली.
गबूने पण डबूला बोरे दिली.
डबूला मजा आली. तो हसला.

इथे या गोष्टीचे चित्र काढ.

खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) बबू, डबू आणि गबू काय आणायला गेले?

---

२) बबू, डबू आणि गबू कुठे गेले असतील? योग्य उत्तराला गोल कर.

(अ) बाजारात (आ) मंडईत (इ) रानात

हे तू कशावरून ठरवलसं ते सांग.

३) डबू का रडू लागला? योग्य उत्तराला गोल कर.

(अ) डबूला बोरे पाडता येत नव्हती म्हणून

(आ) बबू गबूने बोरे दिली नाहीत म्हणून

४) डबूला बोरे का पाडता आली नसतील असे तुला वाटते?

---

शब्दांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण वाक्ये बनव.

जसे – लाल किरण मिरची झाक     किरण लाल मिरची झाक.

दही आहे मामा गोड



आणला बीनाने डबा काल

मोदक तयार आईने केले



दे वनिता दही मामाला

टोपी दे तनूला चिनू

दे पाणी केतन मला

हेमाला केदार दे जेवण

ऐक आणि लिही.



# घटक ४

ख उ थ इ ु ए स ं

अ ढ भ

या घटकातील अक्षरे पाहून लिही.

ख ______ ______ ______ ______ ______ ______

उ ______ ______ ______ ______ ______ ______

थ ______ ______ ______ ______ ______ ______

इ ______ ______ ______ ______ ______ ______

ए ______ ______ ______ ______ ______ ______

स ______ ______ ______ ______ ______ ______

अ ______ ______ ______ ______ ______ ______

ढ ______ ______ ______ ______ ______ ______

भ ______ ______ ______ ______ ______ ______

प ं
प ं
पं
पंखा



खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ं दे आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| कादा | कांदा |
|---|---|

| | |
|---|---|
| कगवा | पतग |
| घटा | कोथिबिर |
| कोबडा | डिसेबर |
| चाभार | वागी |
| चेडू | करवद |
| भेडी | मोसबी |
| बाबू | खाब |
| सुदर | जगल |

फ ु
फ ु
फु
फुगे



खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ु लाव आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| पाहणा | पाहुणा |
|---|---|

| | |
|---|---|
| घबड | बाहली |
| फलपाखरू | दकान |
| मलगी | झरळ |
| हनमान | परणपोळी |
| तकडी | केरसणी |
| गराखी | दपार |
| तकाराम | समन |
| बधवार | कमार |

फळांच्या टोपलीत कोणकोणती फळे आहेत ते बघ आणि त्यांची नावे लिही.



_______________ _______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________ _______________

हे वाच

थंडीचे दिवस होते. सकाळी सहाला पण अंधार होता. तरीही सोनालीने सायकल काढली आणि सरळ मैदानावर पोचली. सोनाली रोजच सकाळी सरावाला जाते. शंभर मीटर धावायचा सराव. एखादवेळी थोडा उशीर झाला तरी ती जातेच. सराव अजिबात चुकवत नाही.

सोनाली कोण असेल? योग्य उत्तराला गोल कर.

(अ) धावपटू (आ) बुद्धीबळपटू (इ) सायकलपटू

ऐक आणि लिही.

_______________ _______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________ _______________

खाली दिलेल्या चौकटीतून वेगवेगळे रंग शोध व लिही.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ना | रं | गी | के | नि |
| जां | पां | गु | श | ळा |
| भ | ढ | ला | री | हि |
| ळा | रा | बी | ल | र |
| म | पि | व | ळा | वा |

ऐक आणि लिही.

अक्षरांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण शब्द बनव.

जसे–गतर – तगर

गरामो ____________ तकपाजारि ____________

वंतीशे ____________ शिगंनिध ____________

लीमेच ____________ सोफाचान ____________

हे वाच

# कागदाची होडी

लक्षात ठेवायचे शब्द
**पाण्याने**

गजाने आज शाळेत खूप सारे रंगीत कागद आणले. कागद राम, लीना, आणि शालूला दिले. मग ते सगळेजण शाळेमागे गेले. लीनाने कागदाची होडी तयार केली. होडी तलावात सोडली. होडी तलावात लाटांवर हलत डुलत फिरू लागली. अचानक एका बेडकाने होडीत उडी मारली. मग काय! होडी पाण्याने भरली आणि बुडून तळाला गेली.



खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) कागदाची होडी कोणी बनवली? ____________________

२) होडी कशी बुडाली? ____________________

३) होडी बुडाली ते तळे कुठे असेल? कशावरून?

____________________________________________

४) होडी बुडाली तेव्हा मंद वारा वाहात होता हे उताऱ्यातील कोणत्या वाक्यावरून कळतं?

____________________________________________

हे वाच

# शिरपूरचा बाजार

आज शनिवार. आज शिरपूरचा बाजार.
रखमा बाजारात गेली. तिने पिशवीतून भाजी आणली.
हिरवीगार गवार, कडूकडू कारली, लाललाल गाजर, ताजाताजा शेपू, फिकट हिरवा कोबी, गडद हिरवी ढोबळी मिरची आणि कोथिंबीर पण आणली. घरी येताच तिने पिशवी रिकामी केली. खूप भाजी झाली. चला आता चार दिवस तरी भाजी आणायला नको.



या उताऱ्यात भाज्यांचे वर्णन करणारे कोणते शब्द आले आहेत त्यांची यादी कर.

_______________ _______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________ _______________

 ऐक आणि लिही.

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

हे वाच

# भुंगा

चंपा शेतात जात होती.

तिकडून मंगलने हाक दिली.

चंपा थांब. मी आले.

चंपा थांबली. मंगल आली.

बांधावरून जाताना दोघींना फुले दिसली.

फुलांवर भुंगे होते.

भुंगे बागडत होते, गुणगुणत होते.

चंपाने हळूच भुंगा पकडला.

मंगल घाबरली. मंगल रडू लागली.

भुंगा सोड. मला भीती वाटते.

अगं घाबरायचे कशाला?

तो काही करत नाही.

चंपाने भुंगा सोडला.

भुंगा इकडेतिकडे आनंदाने उडू लागला.



या उताऱ्यातील कोणाला घाबरट म्हणता येईल?

शब्दांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार कर.

काल मिरची आणली आजीने

______________________________

केलेले पिठले बाबांनी झाले छान

______________________________

लादी पुसली जावेदने आज छान

______________________________

राधाचा मोडला हात जंगलजिमवर खेळताना

______________________________

पेरू झाडावरचे पाडले दुपारी जुईने

______________________________

नारळाची आहेत झाडे वाडीत खूप

______________________________

गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द लिही.

(पिवळी, सुंदर, लाल, पाने, रांगोळीत, सजून, रंगीबेरंगी )

संगिताने जांभळी कांचनची, __________ झेंडूची, पांढरी शेवंतीची आणि __________

गुलाबाची फुले आणली. अंगणात फुलांची __________ रांगोळी काढली. तिने

__________ हिरवी हिरवी __________ पण वापरली. अंगण __________

फुलांनी आणि पानांनी __________ गेले.

चित्रातील मुले /प्राणी काय करत आहेत ते लिही.









खाली दिलेला मजकूर वाच. त्याचे चित्र काढ आणि विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर लिही.

आज आईने दहा लाडू केले. रमाला लाडू फार आवडतात. तिने दोन लाडू घेतले. रमेशदादाने तीन लाडू घेतले. दादाचा एक लाडू जमिनीवर पडला. दादाने लाडू उचलला. पण लाडवाचे बारीक तुकडे तसेच जमिनीवर राहिले. मग बाबा आला. आईने एक लाडू घेतला. थोडासा बाबाला दिला आणि थोडा तिनेच संपवला. सांग बरं आता आईकडे किती लाडू राहिले ?

---

हे वाच

नमाने दुकानातून डाळ आणली. नारळ आणले. साखर पण आणली. आईने नारळाची वडी केली. डाळ वाटून वडे केले. नारळाची झणझणीत चटणी केली. नमाला दिली, बाबाला दिली, आईने पण घेतली.

१) आईने कशाचे वडे केले? योग्य उत्तराला गोल कर.

(अ) डाळीचे (आ) नारळाचे (इ) साखरेचे

२) वडा-चटणी कोणी कोणी खाल्ली? योग्य उत्तराला गोल कर.

(अ) नमा (आ) नमा आणि बाबा (इ) आई, बाबा आणि नमा

३) आईने चटणीत भरपूर मिरची घातली होती हे उताऱ्यातील कोणत्या शब्दावरून कळते?

---




# घटक ५

छ ऊ ठ ज्ञ ऐ ै

औ क्ष ओ ष अं ौ

खालील अक्षरे बघ आणि लिही.

छ

ऊ

ठ

ज्ञ

ऐ

औ

क्ष

ओ

खालील अक्षरे बघ आणि लिही.

ष ______ ______ ______ ______ ______ ______

अं ______ ______ ______ ______ ______ ______

---

क ै

क ै

कै

कैरी

खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ै लाव आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| | |
|---|---|
| बल | बैल |

पलवान सनिक

वमानिक मदान

थली हदर

सैरावरा गरहजर

न ौ

न ौ

नौ

नौका

खाली दिलेल्या शब्दांना योग्य ठिकाणी ौ लाव आणि अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| | |
|---|---|
| च कोन | चौकोन |

ह द म ज

ग री ड लदार

क ले द लत

क शिक फ जदार

चौकटीतून शब्द शोधून लिही.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पा | ऊ | स | क | औ |
| ठ | स | मा | ढ | ष |
| ष | छ | ठ | ई | ध |
| ट | चौ | दा | अं | छ |
| को | को | प | ग | त्री |
| न | न | दी | ठी | ऐ |

खालील संख्या बघ आणि शब्दात लिही.

१ एक

२

३

४

५

६

७

८

९

१०

११

१२

१३

१४

१५

१६

१७

१८

१९

२०

त् ला य जोडला की होतो त्य. त्याच प्रकारे वेगवेगळ्या अक्षरांना य जोडून तयार होणारे शब्द खाली दिले आहेत. ते वाच आणि लिही.

त य
त य
त्य
त्याला

| | | |
|---|---|---|
| ज्याला ________ | खोक्यात ________ | पेट्या ________ |
| माझ्या ________ | पाण्यात ________ | गाद्या ________ |
| चिंध्या ________ | पिशव्या ________ | वह्या ________ |

हे वाच



## मामाचा गाव

कैलास आणि सौरभ मे महिन्यात मामाच्या गावाला, ऐनशेतला गेले. गावातली लहान लहान कौलारू घरे त्यांना फार आवडली. मामाच्या घरामागे ऐसपैस गोठा होता. त्यात मामाचे बैल बांधलेले होते. मामाच्या गावातून वैतरणा नदी वाहते. कैलास आणि सौरभला पोहायची फार हौस. ते रोज संध्याकाळी वैतरणेत पोहायला जायचे. सोबत मामाचा मुलगा गौतम आणि मामाचे बैल असायचेच. बैल धुऊन घरी येताना सगळे कैऱ्या, चिंचा पाडायचे. बैल गोठ्यात बांधून त्यांना वैरण घालेपर्यंत चांगलाच अंधार पडायचा.

महिन्यात
त्यांना
मामाच्या
संध्याकाळी
कैऱ्या
गोठ्यात

खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) कैलास आणि सौरभला काय करायला आवडायचे असे या उताऱ्यात म्हटले आहे?

२) मामाच्या गावातून कोणती नदी वाहते?

३) मामाचा गोठा ऐसपैस होता, म्हणजे कसा होता?

४) या पाठातील ै व ौ ची खूण असणारे शब्द लिही.

ऐक आणि लिही.

अक्षरांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण शब्द बनव.

कुलीछ ____ ठाकोर ____

पाछई ____ नअज्ञा ____

मछुछुम ____ ऊपाल ____

हे वाच

गौरवला ताप आला आहे. सकाळी उठताना छबू मावशीने गौरवच्या अंगाला हात लावला तर अंग तापाने गरम झालेले. मावशीने औषध दिले. मग गौरव अंगणात आला. खरे तर गौरवची परीक्षा चालू आहे. आज विज्ञानाचा पेपर आहे. तापापेक्षा विज्ञानातील बक्षीस जाईल की काय याची गौरवला भीती वाटते आहे. मावशीने शाळेत जाऊ नको असे सांगितले तरी तिचे ऐकायचे नाही असे गौरवने ठरवले आहे.

खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) गौरवला ताप आलाय हे छबू मावशीला कसे कळले?

___

२) गौरवला कशाची काळजी वाटते आहे?

___

३) गौरवला विज्ञान आवडत असेल का? तू हा अंदाज कसा केलास?

___

___

ऐक आणि लिही.

___

___

___

___

गाळलेल्या जागी योग्य शब्द भर.



(मदत, छंद, झाडून, पक्षी, ओंकार, शाळेत, रांगोळी )

मंदारला रांगोळी काढायचा ________ होता. तर ओंकारला ________ निरीक्षणाचा छंद होता. दोघेही रोज सकाळी उठून घरात आजोबांना ________ करायचे. मंदार अंगण ________ सडा टाकायचा, आणि सुंदर ________ काढायचा. ________सहा वाजताच पक्षी बघायला जायचा. तो आठ वाजता परत यायचा. परत दोघेही दहा वाजता ________ जायचे.



शब्दांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार कर.

१) खूप पाण्यात विहिरीतील क्षार आहेत

________________________________

२) आणि क्षमा ज्ञानेशने सकाळी घेतले औषध

________________________________

३) काकूने गरमागरम दुपारी केली भजी

________________________________

४) केलेले काम क्षितीने दिले छपाईला

________________________________

५) वही बक्षीस ज्ञानेशला देणार आहेत आजोबा

________________________________

**ऐक आणि लिही घटक १ पान ०५**

पेन, झेप, चेन, पाने, नेम, पताका, चमचे, कमान, चेतना, केतन,

**ऐक आणि लिही घटक २ पान ११**

मणी, नदी, दही, वही, तलाव, झाकणी, चमेली, पिचकारी, दीपावली, रविवार

**ऐक आणि लिही. घटक २ पान १२**

१)कविता लवकर ये
पाणी आले आहे.
येताना छोटी बादली आण.

२)काकी मिरची आणि दाणे दे.
झणझणीत चटणी करायची आहे.
मामा मामी आले आहेत.

**ऐक आणि लिही. घटक ३ पान १९**

शेत, बोरे, विळी, चिवडा, पिशवी, जिलेबी, झोपाळा, कडबोळी, जादूगार, दानशूर, शेवगा, झाडू, गोधडी, कापूर

**ऐक आणि लिही. घटक ३ पान २०**

आई बाजारातून घरी आली. तिने ताजाताजा पालक आणला. हिरवीगार करडई आणली. पिवळीधमक पपई आणि लाललाल गाजरही आणले.

**ऐक आणि लिही. घटक ३ पान २४**

काशी टेकडीवर निघाली होती. तिला वाटेत गणू भेटला. दोघे मिळून टेकडीवर गेले. वाट जरा अवघड होती. तोल जायची भीती होती, पण दोघेही न पडता टेकडीवर पोहचले.

**शब्द ऐक आणि लिही. घटक ४ पान २७**

थंडी, उंट, मुले, बोकड, हंडा, उसळ, कंगवा, उंदीर, ढेकूण, चुंबक, इमारत, भुईमूग, खुळखुळा, शंकरपाळी, साफसफाई

**ऐक आणि लिही. घटक ४ पान २८**

आजी सक़ाळी उठली. तिने हंडा व कळशीतील पाणी टाकून दिले. भांडी घासून काढली आणि नळाचे ताजे पाणी भरले. पाणी कधीच शिळे होत नाही हे तिला कोण सांगणार.

**ऐक आणि लिही. घटक ४ पान ३०**

ताई बागेत गेली. बागेत खूप फुले होती. फुलांवरून रंगीबेरंगी फुलपाखरे इकडेतिकडे उडत होती. ताई एका झाडाखाली बसली. थंडगार हवा सुटली होती. ताईला झोप लागली. झाडावरून पान पडले. ताई दचकून उठली.

**ऐक आणि लिही. घटक ५ पान ३९**

राक्षस, परीक्षा, छापखाना, छंद, फौजी, औरंगाबाद, मैना, ऊन, पैनगंगा, मीठ, ओढणी, सौदा, चौकीदार, विषय, अंबारी, अंगद

**ऐक आणि लिही. घटक ५ पान ४०**

ऐन शेत गावाजवळ माऊली नावाचा एक डोंगर आहे. डोंगराजवळून एक छानसा ओढा वाहतो. ओढा नेहमी वाहता असतो. खूप पाणी असतं. तिथे मैना, बुलबुल, हळदू, बगळे असे कितीतरी पक्षी येतात. भैरू नेहमीच तिथे बैलांना पाणी पाजायला आणतो.

## चाचणी देण्यापूर्वी

**प्रश्न १) सांगितलेल्या अक्षराला गोल कर. गुण (३)**
या प्रश्नात प्रत्येक अक्षरगटातील एक अक्षर शिक्षकांनी सांगावे. मुलांना सांगण्यापूर्वी अक्षरे ठरवून ती खाली दिलेल्या जागेत लिहून ठेवावीत. तपासताना ही अक्षरे संदर्भासाठी वापरावीत.
प्रत्येक बरोबर अक्षरास अर्धा गुण द्यावा.

________ ________ ________

________ ________ ________

**प्रश्न २) शब्द ऐकून लिही. गुण (५)**
खाली दिलेल्या शब्दांपैकी कोणतेही शब्द श्रुतलेखनासाठी सांगावेत. प्रत्येक शब्द तीन वेळा सांगावा.

**मोगरा, जंगल, नौका, पैसे, खेळ, एकोणसाठ, सेहेचाळीस, झाडू, दुकानदार, ढेकूण, घाबरट, तलवार, यशोदा, फोडी**

प्रत्येक योग्य शब्दाला १ गुण द्यावा.

**प्रश्न ३) गाळलेल्या जागी योग्य शब्द लिही. गुण (३)**
प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण द्यावा.

**प्रश्न ४) उतारा ऐकून लिही. गुण (४)**
खाली दिलेला श्रुतलेखनाचा उतारा सांगावा. उतारा सांगताना प्रथम १ वाक्य त्याचा अर्थ लक्षात यावा म्हणून सलगपणे सांगावे. मग वाक्यातील शब्दांचे अर्थपूर्ण गट करून एक गट सांगून झाल्यावर १० सेकंद थांबावे. मग पुढील गट सांगावा. याप्रमाणे प्रत्येक वाक्य सांगावे. उतारा पूर्ण झाल्यावर संपूर्ण उतारा मुलांना सावकाशपणे वाचून दाखवावा व तपासण्यास सांगावे.

**काल शाळेत हिंदी दिन साजरा केला. काही मुलांनी हिंदी गाणी आणि एका गटाने नाटक सादर केले. सगळी मुले हिंदी बोलत होती. खूप मजा आली.**

उतारा २४ शब्दांचा आहे. त्यामुळे या २४ शब्दांपैकी जर,
१ ते ८ शब्द बरोबर असतील तर १ गुण
९ ते १६ शब्द बरोबर असतील तर २ गुण
१७ ते २४ शब्द बरोबर असतील तर ३ गुण
शिरोरेखा असतील तर अर्धा गुण द्यावा.
४ पूर्णविरामांपैकी २ किंवा २ पेक्षा अधिक पूर्णविराम योग्य जागी दिले असतील तर अर्धा गुण द्यावा.

**प्रश्न ५) चित्रातील माणसे काय करत आहेत. गुण (३)**
या प्रश्नाच्या उत्तरात शुद्धलेखन तपासू नये. कारण या ठिकाणी मुलांची अभिव्यक्ती तपासणे हे उद्दिष्ट आहे.
प्रत्येक योग्य उत्तरास १ गुण द्यावा.
चित्रात माणूस आहे. /चित्रात सायकल आहे. / चित्रात सिलेंडर आहे. अशाप्रकारच्या वाक्यांना गुण देऊ नयेत. माणूस पंखा पुसत आहे. / दादा पखा साप करत आहे./काका पंख्यावरील धूळ काढत आहे. या प्रकारची वाक्ये ज्या वाक्यांमधून माणसे करत असलेली क्रिया स्पष्ट होते आहे त्या वाक्यांनाच गुण द्यावेत व त्या वाक्यांमधील श्रुतलेखन तपासू नये.

**प्रश्न ६) चौकटीतून अर्थपूर्ण शब्द शोधून लिही. गुण (३)**
शोधलेल्या प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण द्यावा.

**प्रश्न ७) शब्दांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार कर. गुण (३)**
प्रत्येक योग्य उत्तरास १ गुण द्यावा.

**प्रश्न ८) उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिही. गुण (५)**
या प्रश्नातून मुलाचे वाचून आकलन तपासायचे आहे. त्यामुळे याही प्रश्नातील उत्तरांमध्ये श्रुतलेखन तपासू नये. उत्तर एका शब्दात किंवा पूर्ण वाक्यात दिलेले असले तरी पूर्ण गुण द्यावेत.
प्रत्येक प्रश्नास किती गुण दिले आहेत ते त्या प्रश्नासमोर लिहीले आहे. उताऱ्या खालील चौथ्या प्रश्नाचे उत्तर प्रत्यक्ष उताऱ्यामध्ये नाही पण विचार करून अंदाज बांधून याचे उत्तर नक्कीच देता येते म्हणून या प्रश्नास मुद्दाम २ गुण दिले आहेत.

**प्रश्न ९) अक्षरांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण शब्द तयार कर. गुण (२)**
प्रत्येक योग्य उत्तरास अर्धा गुण द्यावा.

चाचणी

प्रश्न १) सांगितलेल्या अक्षराला गोल कर. (गुण ३)

१) ध थ ग

२) व ब क

३) म भ श

४) प घ य

५) छ ढ ड

६) ख स ट

प्रश्न २) शब्द ऐकून लिही. (गुण ५)

_______________ _______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________ _______________

प्रश्न ३) गाळलेल्या जागी योग्य शब्द लिही. (गुण ३)

(क्षितिजाची, आठवीत, विज्ञानाचा, पेपर, परीक्षा, लखनौला, चार )

शैलेश आणि _______________ परीक्षा चालू आहे. शैलेश पाचवीत आहे आणि क्षितिजा _______________ . आज दोघांचा पण _______________ पेपर आहे. आजचा पेपर झाला कि संपली _______________ . मग क्षितिजा गौतम काकाकडे _______________ जाणार आहे आणि शैलेश इथेच भोपाळला छबी मावशीकडे जाईल. _________ दिवस राहून दोघे परत येतील.

प्रश्न ४) उतारा ऐकून लिही. (गुण ४)

प्रश्न ५) चित्रातील माणसे काय काय करत आहेत ते बघ आणि लिही. (गुण ३)








प्रश्न ६) चौकटीतून अर्थपूर्ण शब्द शोधून लिही. (गुण ३)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दो | ड | का | मा | बां |
| कौ | ला | रू | सा | ग |
| सै | ल | शे | ग | डी |
| नि | ळा | पू | र | मा |
| क | पा | ट | के | ळी |

_______________ _______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________ _______________

प्रश्न ७) शब्दांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार कर. (गुण ३)

१) कचरा दारात फार आहे.

_______________________________________________

२) कागदाची केली छोटी रीनाने फुले.

_______________________________________________

३) पाणी आटले नदीचे आहे.

_______________________________________________

प्रश्न ८) वाचून उत्तरे लिही.

कौलाखाली भिंतीवर थोडीशी मोकळी जागा होती. खालून ती नीट दिसायची नाही. एके दिवशी तिथे चिमणीने घरटं बांधायला सुरुवात केली. गवत, कापूस, काडी असं काहीबाही चोचीत घेऊन चिमणी ये जा करताना दिसू लागली. फटीतून भिंतीवर गवत लोंबताना दिसू लागले. चिमणीने तिथे अंडी घातली असणार. एक दिवस भिंतीवरून चिवचिवाट ऐकू येऊ लागला. चिमणीची पिले दिवसभर ओरडायची. चिमणी पिलांना भरवायची. खूप दिवस गेले. मग एके दिवशी अचानक पिलांचा आवाज यायचा थांबला. चिमणा चिमणी ही यायचे बंद झाले. शिडी लावून भिंतीवर पाहिले तर काय घरटे रिकामे.

१) चिमणीने घरटे कुठे बांधलं? (गुण १)

________________________________________

२) चिमणा-चिमणीने घरटं बाधायला काय काय जमवलं? (गुण १)

________________________________________

३) चिमणीने घरटे का बांधलं? (गुण १)

________________________________________

४) पिलांचा चिवचिवाट एकदम का बंद झाला असेल? (गुण २)

________________________________________

________________________________________

प्रश्न ९) अक्षरांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण शब्द बनव. (गुण २)

१) ळू क झु ____________ ३) ह क तू वा ____________

२) ला प शिं ____________ ४) च का पि री ____________

# गुणपत्रक

मुलाचे नाव – ______________________________

घटक १ सुरू केल्याचा दिनांक – ______________________________

घटक ५ संपल्याचा दिनांक – ______________________________

चाचणी दिल्याचा दिनांक – ______________________________

गुणपत्रक भरल्याचा दिनांक – ______________________________

| प्रश्न क्र. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मिळालेले गुण | | | | | | | | | | |

खालील भाग चांगले समजले आहेत.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

खालील भागांसाठी सरावाची गरज आहे.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

